# 'गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्स'तर्फे 'यूव्ही केस' सादर

## भारतात आरोग्य सुरक्षा पोर्टफोलिओचा विस्तार

मुंबई (प्रतिनिधी) : भविष्यकालीन स्वरुपाची सुरक्षाविषयक उत्पादने बनविणाऱ्या गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्स या आघाडीच्या ब्रँडने 'कोविड'पासून संरक्षण मिळवून देणारी यंत्रणा सादर करून आरोग्य सुरक्षा क्षेत्रात प्रवेश केला आहे. आरोग्य सुरक्षाविषयक उत्पादनांना असलेली मोठी मागणी लक्षात घेऊन 'गोदरेज'ने 'यूव्ही केस' हे उत्पादन सादर केले व आपल्या आरोग्य सुरक्षा विभागाचा विस्तार केला. दररोजच्या वापरातील वस्तू, उपकरणे व आवारात प्रवेश करताना अनेकजणांचा स्पर्श होणारे पृष्ठभाग यांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी हे उपकरण वापरण्यात येते.

'गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्स'कडून नव्याने सादर करण्यात आलेल्या 'यूव्ही केस'मध्ये 'यूव्ही-सी लाईट' निर्जंतुकीकरण तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. निर्जंतुकीकरणाची माहिती व अनुभवजन्य पुराव्यांच्या आधारावर विषाणू व जंतूंचा फैलाव रोखण्यासाठी अनेक स्वरूपाचे प्रतिबंध निर्माण करणारे हे उपकरण आहे. 'सार्स-कोव-१' यासह अन्य विषाणू व जीवाणू यांच्या ६५हून अधिक जातींचा नायनाट करण्यासाठी जगभरात सर्वात जास्त वापरली जाणारी 'यूव्ही-सी निर्जंतुकीकरण' ही वैज्ञानिक पद्धत आहे.

या उत्पादनाविषयी 'गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्स'चे उपाध्यक्ष मेहेरनोश पिठावाला म्हणाले, ''पिण्याचे पाणी, सांडपाणी, हवा, औषधी उत्पादने आणि पृष्ठभाग यांच्या निर्जंतुकीकरणासाठी व मानवी शरीरात प्रवेश करू शकणाऱ्या सर्वच विषाणूंचा नायनाट करण्यासाठी 'यूव्ही-सी लाईट' ही यंत्रणा गेल्या ४० वर्षांपासून वापरली जात असल्याचे अभ्यासातून दिसून आले आहे. आज, आरोग्य सुरक्षा हा प्रत्येकाच्या प्राधान्याचा विषय आहे.